राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना महाराजा सयाजीराव गायकवाड परदेशी शिष्यवृत्ती योजना राबविण्यासाठी नवीन लेखाशीर्ष उघडण्यास मंजुरी देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## नियोजन विभाग

### शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०२५/प्र.क्र.१८४/का.१४२५-अ

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २५ मे, २०२६.

**संदर्भ :-**

शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: सारथी-२०२२/प्र.क्र.२८९/का-१४२५-अ,
दि.२० जुलै,२०२३

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या जातीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असून आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून संदर्भाधीन शासन निर्णय, दि.२०.०७.२०२३ अन्वये छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे संस्थेमार्फत परदेशी शिष्यवृत्ती योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर शिष्यवृत्तीची योजना राबविण्यासाठी सध्या "ओ-२, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण, ०३, मागासवर्गीयांचे कल्याण, १०२, आर्थिक विकास (०१) मराठा, कुणबी, कुणबी मराठा, मराठा कुणबी यांचे कल्याण (०१)(०१) छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) (कार्यक्रम) (२२२५एफ५२१)" या लेखाशीर्षाखाली निधी उपलब्ध करुन दिला जात आहे. तथापि, सदर योजनेसाठी स्वतंत्र लेखाशीर्षाखाली निधी उपलब्ध करुन देण्यासाठी नवीन लेखाशीर्ष उघडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना सयाजीराव गायकवाड परदेशी शिष्यवृत्ती योजनेसाठी मागणी क्र.ओ-२ अंतर्गत खालीलप्रमाणे नवीन लेखाशीर्ष उघडण्यास मान्यता देण्यात येत आहे:

| मागणी क्र ओ-२ ( O-२ ) | | | |
|---|---|---|---|
| २२२५ | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण | २२२५ | Welfare of Scheduled Castes, Scheduled Tribes, Other Backward Classes and Minorities |
| ०३ | मागासवर्गीयांचे कल्याण | ०३ | Welfare of Backward Classes |
| २७७ | शिक्षण | २७७ | Education |

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी यांचे कल्याण | ०१ | Welfare of Maratha, Kunabi, Kunabi Maratha, Maratha Kunbi |
| (०१)(०१) | मराठा, कुणबी, कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी सयाजीराव गायकवाड शिष्यवृत्ती | (०१)(०१) | Sayajirao Gaikwad Scholarship for meritorious students from the Maratha, Kunbi, Kunbi-Maratha and Maratha-Kunbi Communities for Higher education abroad |
| | कार्यक्रम / दत्तमत<br>संगणक संकेतांक (२२२५जी७३३) | | Scheme/Voted<br>C.R.C.(२२२५G७३३) |

२. हे आदेश महालेखापाल कार्यालय (लेखा व हकदारी)-१, महाराष्ट्र, मुंबई यांच्या अनौ.संदर्भ क्रमांक सं.ख.वि/चा-५/नियोजन विभाग/यूओआर-३२३ /२०२५-२६/२३३०, दिनांक ०६.०३.२०२६ तसेच वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्रमांक २४८/२०२६/व्यय-८, दिनांक १५.०५.२०२६ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०५२५१०५३२०३४१६ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GEETANJALI SHRIRAM BAVISKAR

Digitally signed by GEETANJALI SHRIRAM BAVISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Planning Department, 2.5.4.20=A03A9E9727B369EEB75B33D163EE9206A6B63C23E1DB3F22DAFB1DD79B967A3D, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5EAB451FA908D44F55D92D15BD59E941FB8BB2966266D020EB30C8667F18AD4B, cn=GEETANJALI SHRIRAM BAVISKAR
Date: 2026.05.25 10:54:14 +05'30'

**(गीतांजली बाविस्कर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा.मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई
५. मा.विरोधी पक्षनेता,विधानपरिषद , विधानभवन,मुंबई
६. सर्व प्रशासकीय विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई
७. सचिव व विकास आयुक्त यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक,नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई
८. प्रधान महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
९. प्रधान महालेखापाल, (लेखापरीक्षा),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
१०. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
११. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,छत्रपती संभाजीनगर,नागपूर

१३. व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे

१४. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई (प्रसिध्दीसाठी)

१५. सह सचिव (कार्यासन व्यय-८ व अर्थ -१६), वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई

१८. उप सचिव (का.१४११ व १४२४), नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई

१९. सह संचालक,लेखा व कोषागारे,संगणक कक्ष,नवीन प्रशासन भवन,५ वा मजला,मुंबई.

२०. निवडनस्ती कार्यासन १४२५-अ